**प्रेसनोट**

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाच लुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. प्रमोद हरीभक्त दांदडे, वय ५१ वर्षे, पद–तलाठी वर्ग ३, सजा सुलतानपुर ता. लोणार जि.बुलडाणा रा. शिवाजी चौक, उंद्री, ता. चिखली जि. बुलडाणा ह.मु. दत्तात्रय सुरूशे यांचे घरी भाड्याने, जालना रोड, सुलतानपुर ता. लोणार जि. बुलडाणा |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,०००/– रुपये |
| घटनास्थळ | न्यु भोलेनाथ भोजनालय अॅन्ड वाईन बार सुलतानपुर ता. लोणार |
| घटना तारीख | दि. ०५.०८.२०२२ |

थोडक्यात हकीकत :–

गुन्हयाची हकीकत अश्याप्रकारे आहे की, तक्रारदार वय ४५ वर्षे व्यवसाय–शेती व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी ग्राम सुलतानपुर येथील ई–क्लास मधील भाडेपटटीवर घेतलेल्या शेतीच्या वहीवाटीच्या रस्त्यावर सुलतानपुर येथील महीलेने अतिक्रमण केलेबाबत तक्रारदार यांनी तहसीलदार लोणार यांचेकडे लेखी तक्रार दिलेली आहे. सदर बाबत तहसीलदार लोणार यांच्याकडुन चौकशी सुरु आहे. सदर चौकशीत तहसीलदार यांनी तक्रारदार व त्यांचे साथीदार यांच्या वहीवाटीच्या रस्त्यावर अतिक्रमण केलेले आहे किंवा नाही? याबाबत तलाठी, ग्रामसेवक व मंडळ अधिकारी सुलतानपुर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्यास सांगीतले आहे. सदरचा अहवाल आलोसे यांचे स्तरावर लवकर पाठविण्यासाठी यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचे पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष ४०००/– रुपये लाचेची मागणी करुन सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक यांना ४०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तरी यातील आलोसे श्री. प्रमोद हरीभक्त दांदडे, वय ५१ वर्षे, पद–तलाठी वर्ग ३, सजा सुलतानपुर ता. लोणार जि.बुलडाणा रा. शिवाजी चौक, उंद्री, ता. चिखली जि. बुलडाणा ह.मु. दत्तात्रय सुरूशे यांचे घरी भाड्याने, जालना रोड, सुलतानपुर ता. लोणार जि. बुलडाणा यांचेविरुध्द कलम ७ भ्रष्टाचार प्रतीबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर कार्यवाही :–१. मा. श्री.विशाल गायकवाड,पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

२. मा. श्री.अरुण सावंत,अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

३. मा. श्री. देविदास घेवारे, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती

४. मा. श्री.संजय चौधरी, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा व सापळा पथकातील स्टाफ पोहेकॉ राजेंद्र क्षिरसागर, नापोकॉ प्रविण बैरागी, जगदीश पवार, पोकॉ अझरोद्दीन काझी, चालक पोकॉ शेख अरशद ला.प्र. वि. बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा, कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा

Sachin
( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा